RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ८४] सोमवार, ऑगस्ट ७, २०२३/श्रावण १६, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७०**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास व पंचायत राज विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक ७ ऑगस्ट २०२३.

### अधिसूचना

क्रमांक संकीर्ण-५०१९/प्र. क्र.६९/आस्था-१०.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५) याच्या कलम २७४, पोट-कलम (२) खंड (सदतीस) व (एकोणचाळीस) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम, १९६८ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी उक्त कलम २७४, पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे उक्त नियमांचा मसुदा या नियमामुळे बाधित होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तीच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे, आणि अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही हरकती/सूचना कोणत्याही व्यक्तीकडून प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी प्राप्त होतील, तर त्यावर शासन विचार करील.

### प्रारूप नियम

१. या नियमास "महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (प्रथम सुधारणा) नियम, २०२३" असे म्हणण्यात येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम, १९६८ यातील नियम क्रमांक ६ मधील पोट-नियम ( १ ) नंतर पुढील पोट-नियम दाखल करण्यात यावाः—

"जिल्हा परिषदेतील ज्या कर्मचाऱ्यांना केंद्रीय उपदान कायदा, १९७२ ( कलम ३९ ) च्या तरतुदी लागू आहेत, अशा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन ) नियम, १९८२ च्या तरतुदी लागू राहणार नाहीत."

सदर नियम पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पो. द. देशमुख,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND PANCHAYAT RAJ DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzban Path, Fort,
Mumbai 400 001, dated 7th August 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis.

No. MISC-5019/C.R.69/EST.10.—The following draft of rules further to amend the Maharashtra Zilla Parishads District Services Rules, 1968, Which the Government of Maharashtra proposes Act, 1961 to make in exercise of the powers conferred by clause *(xxxvii)* and *(xxxix)* of sub-section (*2*) of section 274 of Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, (Mah.V of 1962) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*3*) of section 274 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given the said draft rules will be taken in to consideration by the Government of Maharashtra on or after the 9th of September, 2023.

2. Any objection or suggestion which may be received by the Principle Secretary, Rural Development and Panchayat Raj Department, Bandhakam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001, from any person with respect to the said draft before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Zilla Parishads District Services (First Amendment) Rules, 2023.

2. In rules (6) of the Maharashtra Zilla Parishads District Service Rules, 1968, to sub-rule (1), the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, the provisions of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 shall not apply to the *Parishad* employee, to whom the provisions of the Payment of Gratuity Act, 1972 (39 of 1972) are applicable"

This Rules applicable retrospectively.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. D. DESHMUKH,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.